# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.



Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

२१ एप्रिल, २०२०

☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)


# मंदीरातील दान पेटी फोडण्याच्या प्रयत्न करणाऱ्या आरोपींना कारावासाची शिक्षा

पोलीस स्टेशन भद्रावती अंतर्गत जैन मंदीर येथील दान पेटी फोडण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीस १९/०५/२०२० रोजी **श्री. डी. के. भेंडे, सत्र न्यायाधीश क्र. १ कोर्ट वरोरा** यांनी शिक्षा ठोठावली.

पोलीस स्टेशन भद्रावती अंतर्गत जैन मंदीर येथील चौकीदार फिर्यादी नामे संदीप रामचंद्र घोटेकर वय ३५ रा. जैन मंदीर, भद्रावती हा रात्रो दरम्यान आपल्या कर्तव्यावर असतांना आरोपी नामे हरजींत सिंग हरिसिंग जुनी वय २० आणि इतर ७ आरोपी इसम सर्व रा. परतुर जि. जालना यांनी फिर्यादीस चाकुचा धाक दाखवुन मंदीरातील दान पेटी फोडण्याचा प्रयत्न केला. अशा फिर्यादीच्या रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भद्रावती येथे अप.क्र. १३८/२०१५ कलम ३९५,३९७,३९८,३४२,३४ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

गुन्हा तपासात घेतल्यानंतर तत्कालीन तपासी अधिकारी पोस्टे भद्रावती सहायक पोलीस निरिक्षक श्री. डब्लु एच हेमणे यांनी आरोपीतांना निष्पन्न करून आरोपीविरूध्द सबळ पुराव्यानिशी न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

न्यायालयाचे सुनावणी दरम्यान सदर प्रकरणात न्यायालयाने साक्षीदार तपासले व योग्य पुराव्याच्या आधारे दिनांक १९/०५/२०२० रोजी आरोपी **आरोपी नामे हरजींत सिंग हरिसिंग जुनी वय २० आणि इतर ७ आरोपी इसम सर्व रा. परतुर जि. जालना यांना कारावासाची शिक्षा श्री. डी.के. भेंडे, सत्र न्यायाधीश क्र. १ कोर्ट वरोरा जि. चंद्रपुर यांनी** ठोठावली आहे. सदर प्रकरणामध्ये सरकार तर्फे **ॲड. गोविंदा उराडे, सरकारी अभियोक्ता, चंद्रपूर** आणि कोर्ट पैरवी म्हणुन सफौ. दिलीप पोहाने, पोलीस स्टेशन भद्रावती यांनी काम पाहिले.

---

☎ : 07172-264300
: 07172-255800
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
✍: 7276494810 (PRO)

# चोरी घरफोडी करणारा आरोपी रामनगर पोलीसांच्या जाळयात

## आरोपीकडुन गुन्हयातील ४ मोबाईल हस्तगत

दिनांक २०/०५/२०२० रोजी पोलीस स्टेशन रामनगर येथील गून्हे शोध पथकाने दाखल गुन्हयांपैकी चोरी आणि घरफोडीच्या दोन गुन्हंयाचा उलगडा लावला आहे. सदर गुन्हयात एका आरोपीस अटक करण्यात आली असुन ४ मोबाईल फोन जप्त करण्यात आले आहे.

दिनांक ११/१०/२०१९ रोजी साईमंदीर वार्ड चंद्रपुर येथील रहिवासी फिर्यादी हे घरी हजर असताना रात्रो दरम्यान अज्ञात इसमाने घरात प्रवेश करून तिन मोबाईल फोन आणि नगदी असा एकुण २२,४५०/—रू चा मुद्देमाल चोरून नेला आहे. याबाबत पोलीस स्टेशन रामनगर येथे अप.क्र. ५८७/२०१९ कलम ३८० भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

तसेच दिनांक ०५/०१/२०२० रोजी जलनगर वार्ड चंद्रपुर येथील रहिवासी फिर्यादी हे रात्रोला आपल्या घरी झोपलेले असता, कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांच्या घराचा दरवाजा काढुन आत प्रवेश करून दोन मोबाईल फोन आणि नगदी रोख असा एकुण १८,३५०/—रू चा मुद्देमाल चोरून नेला आहे. याबाबत पोलीस स्टेशन रामनगर येथे अप.क्र. १३/२०२० कलम ४५७,३८० भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर दोन्ही गुन्हयाचा तपास तांत्रीक विश्लेषण आणि तपास कौशल्य वापरून आरोपीचा शोध लावण्यास रामनगर पोलीसांना यश आले आहे. सदर आरोपीस ताब्यात घेवुन चोरीच्या मुद्देमालाबाबत विचारपुस करून आरोपीकडुन दोन गुन्हयातील ४ मोबाईल फोन जब्त करण्यात पोलीसांना यश आले आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक चंद्रपुर डॉ. महेश्वर रेड्डी व श्री. शिलवंत नांदेडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी चंद्रपुर यांचे मार्गदर्शनामध्ये पोलीस स्टेशन रामनगर पोनि. श्री. हाके यांचे नेतृत्वात पोउपनि संदीप कापडे यांचेसह पोहवा. रजनिकांत पुठ्ठावार, आनंद परचाके, पुरूषोत्तम चिकाटे, पोशि. विकास जुमनाके यानी महत्वपुर्ण कामगीरी बजाविली आहे.